International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# भारतातील आयकर प्रणाली

**डॉ.सतीश राणे**

कला व वाणिज्य महाविद्यालय वरवट बकाल, जि. बुलडाणा.

**गोषवारा :**

भारतामध्ये आयकर प्रणाली फार पूर्वीपासून सुरु असलेली दिसून येते, १८६० मध्ये भारतीयांवर पहिल्यांदा प्राप्तिकर लादला गेला. प्राप्ति कराची घोषणा जेम्स विल्सन या पहिल्या इंग्रज 'फायनान्स मेंबर' ने १८६० मध्ये केली. भारतामध्ये आयकर अधिनियम १९६१ अस्तित्वात आल्यानंतर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर याची विभागणी करण्यात आली आज उत्पन्नाच्या साधनानुसार आयकर आकारण्याकरिता उत्पन्नाचे आयकर अधिनियम १९६१ नुसार पाच प्रकार पाडण्यात आलेले आहेत, आयकर किंवा प्राप्तिकर या नावने भारतात ओळखला जाणारा हा करप्रकार थेट कर (डायरेक्ट टॅक्सेस) या गटात मोडतो, भारतामध्ये कर संचालित करण्याची प्रक्रिया हि आयकर अधिनियम १९६१ नुसार चालते.

**प्रस्तावना :**

आयकर या शब्दाचा अर्थ उत्पन्नावर आकारलेला कर आहे आयकर हा प्रत्येक देशाचे शासन व्यक्तीच्या उत्पन्नावर आकारीत असते Adam Smith यांनी १७१६ मध्ये An enquiry into in to the nature and causes of wealth of nation (राष्ट्राची संपत्ती) हा ग्रंथ लिहिला आणि या ग्रंथा मध्ये त्यांनी प्रत्येक देशाच्या शासनाचे काही कार्य सांगिले आहे यामध्ये परकीय आक्रमणापासून रक्षण, देशांतर्गत शांतात आणि सामाजिक कल्याण हि प्रमुख कार्ये करण्यासाठी प्रत्येक देशाच्या शासनाला वित्ताची गरज असते हि गरज पूर्ण करण्यासाठी त्या देशाचे शासन तेथील नागरिकांच्या उत्पन्नावर कर आकारीत असतात याला आयकर म्हटल्या गेले आहे.

भारतालील करप्रणाली फार प्राचीन कालखंडापासून सुरु असलेली दिसून येते भारतामध्ये ज्या वेळी राजेशाही होती या राजेशाही मध्ये विविध प्रांता नुसार तेथील नागरिकांच्या उत्पन्नवर ठराविक दरानुसार कर आकारल्या जात होता यावेळी कर आकारण्याचा दर हा प्रत्येक राज्याच्या शासनानुसार वेगवेगळा दिसून येतो. त्यानंतर ब्रिटीश कालखंडा मध्ये सुद्धा भारतातील नागरिकांवर ब्रिटीश सरकार कर आकारीत असे, राजेशाही व ब्रिटीश सरकार ज्या वेळी नागरिकांवर कर आकारीत असत त्या वेळी भारतामध्ये नागरिकांच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन हे शेती पासून मिळणारे उत्पन्न होते, आज उत्पन्नाच्या साधनानुसार आयकर आकारण्याकरिता उत्पन्नाचे आयकर अधिनियम १९६१ नुसार पाच प्रकार पाडण्यात आलेले आहेत, आयकर किंवा प्राप्तिकर या नावने भारतात ओळखला जाणारा हा करप्रकार थेट कर (डायरेक्ट टॅक्सेस) या गटात मोडतो १८६० मध्ये भारतीयांवर पहिल्यांदा प्राप्तिकर लादला गेला. प्राप्ति कराची घोषणा जेम्स विल्सन या पहिल्या इंग्रज 'फायनान्स मेंबर' ने १८६० मध्ये केली. व्यक्तिच्या किंवा संस्थेच्या वार्षिक उत्पन्नावर लावल्या जाणाऱ्या या कराच्या आकारणीला ब्रिटीश काळात प्रारंभ झाला .सध्या भारतात आयकर हा व्यक्ती किंवा संस्थांवर त्यांच्या द्वारे कमावलेल्या उत्पन्नाच्या किंवा नफ्याच्या उत्पन्नावर लादलेला कर आहे, कंपन्यां वर लादलेला कर सामान्यतः कॉर्पोरेट कर म्हणून ओळखला जातो आणि हा कर सामान्यतः सपाट दराने आकारला जातो. वैयक्तिक उत्पन्नावर बऱ्याचदा प्रगतीशील दराने कर आकारला जातो जेथे उत्पन्नाच्या प्रत्येक अतिरिक्त युनिटवर लागू कर दर वाढतो म्हणजेच व्यक्तीचे उत्पन्न वाढल्यास कराचा दर सुद्धा वाढू शकतो.

भारतात Income Tax Act १९६१ असे नाव असलेला कायदा राष्ट्रप्रतिनि मंजूर केला आणि १ एप्रिल १९६२ पासून अमलात आणला गेला यापूर्वी भारतात Income Tax Act १९२२ अमलात होता या कायद्यात बऱ्याच दुरुस्त्या झाल्यामुळे हा कायदा बराच गैरसोयीचा झाला होता त्यामुळे भारत सरकारने नवीन कायदा केला आयकर कायद्यानुसार कराचे दोन प्रकार पाडण्यात आलेले आहे प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर ज्या वेळी कराचा घात व कराचा भार एकाच

व्यक्तीवर पडतो त्याला प्रत्यक्ष कर असे म्हटले आहे यामध्ये आयकराचा समावेश होतो व ज्या वेळेला कारचा घात आणि कारचा घात आणि कारचा भार हा पुढे ढकलण्यात येतो त्याला अप्रत्यक्ष कर असे म्हणतात यामध्ये विक्रीकर आणि VAT चा समावेश होतो.

- **आयकर अधिनियम १९६१ द्वारे उत्पन्नाचे प्रकार :**
  आयकर अधिनियम १९६१ नुसार कर आकारण्याकरिता उत्पन्नाचे पाच प्रकार पाडण्यात आले आहे या प्रकारानुसार उत्पन्नावर कर आकारण्यात येतो
  १. वेतनापासून उत्पन्न : विशिष्ट व्यक्ती विशिष्ट संस्थे मध्ये विशिष्ट कालावधी मध्ये विशिष्ट दराने कार्य करून उत्पन्न कमावीत असेल त्या उत्पन्नास वेतनापासून उत्पन्न असे म्हणतात.
  २. गृहसंपत्ती पासून उत्पन्न: विशिष्ट व्यक्तीच्या मालकीची काही गृहसंपत्ती असेल आणि ती गृहसंपत्ती विशिष्ट दराने राहण्याकरिता किंवा व्यवसायाकरिता भाड्याने दिली असेल व त्या पासून उत्पन्न प्राप्त होत असेल त्या उत्पन्नास गृहसंपत्ती पासून उत्पन्न असे म्हणतात.
  ३. व्यापार व पेशा पासून उत्पन्न : आयकर कायदा १९६१ मध्ये व्यापार व पेशा पासून उत्पन्न हे एकाच अर्थाने उपयोगात आपले जाते व्यापारामध्ये वस्तू व सेवांच्या विक्री पासून जे खर्चावर उत्पन्नाचे जे आधिक्य शिल्लक राहते तो नफा ठरतो प्राप्त नफा हा व्यापारा पासून उत्पन्न आहे , त्याचप्रमाणे आपल्या बुद्धी कौशल्यावर जो व्यक्ती उत्पन्न कमवितो ते पेशा पासून उत्पन्न ठरते
  ४. भांडवली नफा : व्यापार व्यसायामध्ये उपयोगात आणलेल्या भांडवली वस्तूच्या विक्री पासून जो नफा मिळतो त्याला भांडवली नफा असे म्हटले जाते. भांडवली नफ्याचे दोन प्रकार पडतात अल्पकालीन व दीर्घकालीन भांडवली नफा.
  ५. ईतर साधनांपासून उत्पन्न : ज्या उत्पन्नाचा समावेश वरील चार उत्पन्नाच्या प्रकारामध्ये होत नाही असे सर्व उत्पन्नाचा समावेश ईतर साधनांपासून उत्पन्न यामध्ये होतो यामध्ये व्याज, लाभांश, भेटवस्तू, बक्षीस, लॉटरी, भविष्य निर्वाह निधी असे उत्पन्न यामध्ये समाविष्ट केले जाते.

- **कृषी उत्पन्न** :
  भारतामध्ये शेत जमिनीपासून मिळणाऱ्या उत्पन्नास कृषी उत्पन्न असे म्हणतात कृषी उत्पन्न हे आयकर अधिनियम १९६१ कलम १० (१) नुसार आयकर मुक्त आहे, याकरिता ती शेत जमीन भारतामध्ये स्थित असावी व तिचा उपयोग केवळ कृषी कार्याकरिता केला गेला पाहिजे.

- **सकल उत्पन्नातून कपाती** :
  आयकर अधिनियम १९६१ नुसार उत्पन्नाचे पाच प्रकार पाडण्यात येतात या पाच उत्पन्नाच्या एकत्रित उत्पन्नास सकल उत्पन्न म्हटले जाते एकून सकल उत्पन्न हे करपात्र मानले जात नाही तर आयकर कायद्याच्या कलम ८० प्रमाणे सकल उत्पन्नामधून विविध प्रकारच्या कपाती वजा केल्या जातात कलम ८० अंतर्गत ८० सी. ते ८० यु. पर्यंतच्या कपाती येतात यातील काही कपाती पुढीलप्रमाणे.
  कलम ८० ई- शैक्षणिक कर्जा वरील व्याज :- स्वतःच्या पत्नीच्या किंवा मुलांच्या उच्च शिक्षणा साठी (मेडिकल, इंजिनिअरिंग, मैनिजमेंट या सारख्या ग्रॅज्युएट किंवा पोस्ट ग्रॅज्युएट शिक्षण ) तसेच १२ वी नंतर कोणताही कोर्स करण्या साठी घेतलेल्या शैक्षणिक कर्जाच्या गतवर्षात भरलेल्या व्याजा संबंधात मिळू शकते.)
  कलम ८० ई ईबी :- इलेक्ट्रीक ( बॅटरी) वर चालणारे वाहन खरेदि करण्यासाठी बँके कडून किंवा अन्य वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज १५००००/- पर्यंत वजावट मिळेल
  कलम ८० डी :- वैद्यकिय विम्याचे हप्ते जर कर्मचारी स्वतः चा अगर वैवाहित साथीदाराचा, त्याच्यावर अवलंबुन असलेले अपत्ये त्यांच्या वैद्यकिय विम्याचे हप्ते भरत असेल त्यास रु. २५०००/- पर्यंत वजावट मिळेल ज्या व्यक्तिचा हप्ता भरत असेल ती व्यक्ती ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरीक असेल तर ही वजावट रु. ३००००/- पर्यंत मिळते.

८० डीडी :- अपंग नातेवाईकाचा खर्च किंवा त्यांच्या पुर्नवसन / कल्याणकारी योजनेसाठी यावर केलेला खर्ववै रु.७५०००/- तीव्र अपंगत्वासाठी रु. १५००००/- अपंग नातेवाईकाचे पुनर्वसन गाव होणारा हा खर्च यासाठी साधारणतः असतात अ) अवलंबून अपंग व्यक्ती असलेली व्यक्ती कर्मचाऱ्याची नातेवाईक असावी तसेच ती कर्म असावी. ब) ती व्यक्ती आयकर नियमाच्या क्र. ११ ए प्रमाणे कायमची अपंग (जसे दृष्टीदोष, एक बधिर,अस्थिरोग, मतिमंदता, सेखिल पाल्सी असे अपंगत्व) ही वजावट देतांना असे अपंगत्व सक्षम सरकारी वैद्यकीय तज्ञाने प्रमाणित केले कर्मचाऱ्याने त्यासाठी प्रत्यक्ष खर्च केलेला असावा. किंवा ठेव ठेवलेली असावी.

८० डी डी बी : वैद्यकिय औषधोपचारावरील खर्च कुटुंब किंवा अवलंबित व्यक्तीला झालेल्या कॅन्सर, एड्स, पार्किन्सन इत्यादी गंभिर आजारावरील उपचारासाठी केलेला खर्च रु. ४००००/- पर्यंत वजावट मिळेल, रुग्ण ६० वर्षा पुढील असल्यास रु.६० रुग्ण ८० वर्षापेक्षा जास्त असल्यास ८०हजार या प्रामणे) या साठी १० आय या नमुन्यात अर्ज डॉक्टरांचे प्रमाण • सादर कराव्यात तसेच या बाबत काही रक्कम मेडिक्लेम अंतर्गत परत मिळालेली असल्यास ती बजा होईल.

कलम ८० यू : कर्मचारी स्वतः अपंग असल्यास करपात्र रक्कम परिगणना करतांना कलम ८० यू प्रमाणे रु. ७५००००/- वजावट देता येते त्याचे अपंगत्व तीव्र स्वरुपाचे असल्यास ही बनावट रु. १२५०००/- एवढी देता येते. या साठी कर्मचाऱ्याने पुढील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. अ) तो पूर्णतः किंवा अधिकांश अंध असल्यास ब)तो कायमचा शारीरिक अपंग असावा किंवा क) तो मतिमंद असलेल, ड) तो मुक बधिर असेल किंवा तो ऑटिझम, सेखिल पाल्सी किंवा विविध अंगाने विकलांगतेने ग्रस्त असेल या या सर्व बाबती आयकर नियमाच्या नियम क्रमांक ११ दी प्रमाणे असे अपंगत्व असेल आणि त्याने या बाबत च्या सक्षम वैद्यकिय अधिकाऱ्याचा दाखला आणला असेल तर ही वजावट देता येते.

८० जी : (१) मान्यताप्राप्त लोकोपयोगी संस्थांना दिलेली देणगी सर्व वजावटी जाऊन जे निव्वळ उत्पन्न रहाते त्याच्या १० टक्यांपर्यंत देणगी विचार घेतली जाते व त्या रक्कमेच्या ५०% वजावट मिळते. [देणगी रक्कम रु. २०००/- पेक्षा जास्त असल्यास ती चेक किंवा ड्राफ्ट इ देणे बंधनकारक ] (२)जर देणगी पंतप्रधान निधी, भूकंप, दुष्काळ, मुख्यमंत्री निधी यांना दिलेल्या देणग्या १००% वजावट

- **प्राप्तीनुसार आयकराचे विभाजन** :
  भारतामध्ये प्राप्त सकल उत्पनावर विविध दराने आयकर आकारण्यात येतो सन २०२१-२०२२ मध्ये हा दर पुढीलप्रमाणे होता.

**आर्थिक वर्ष १.४.२०२० ते ३१.०३.२०२१ साठी आयकराचे दर पुढीलप्रमाणे**

| Income Tax Slabs (Old Regime) for गतवर्ष 2020-21 (कर आकारनि वर्ष 2021-22) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **सामान्य** | | **जेष्ठ नागरिक** | | **अति जेष्ठ नागरिक** | |
| **६० वर्षा खालील** | | **६० ते ८० वयापर्यंत** | | **८० वर्षापेक्षा जास्त** | |
| **उत्पन्न** | **कराचा दर** | **उत्पन्न** | **कराचा दर** | **उत्पन्न** | **कराचा दर** |
| रु. २.५ लाख पर्यंत | ०% | रु. ३ लाख पर्यंत | ०% | रु. ५ लाख पर्यंत | ०% |
| रु. २.५ ते ५ लाख | ५ % | रु. ३ ते ५ लाख | ५ % | रु. ५ ते १० लाख | २० % |
| रु. ५ ते १० लाख | २० % | रु. ५ ते १० लाख | २० % | रु १० लाखां पेक्षा जास्त | ३० % |
| रु १० लाखां पेक्षा जास्त | ३० % | रु १० लाखां पेक्षा जास्त | ३० % | | |

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

**देशांतर्गत कंपन्या.**

| उलाढाल तपशील | देशांतर्गत कंपन्या | फर्म्स |
|---|---|---|
| INR ४०० कोटी पर्यंतच्या उलाढालीसाठी प्राप्तिकर | २५% | ३०% |
| INR ४०० कोटींपेक्षा जास्त उलाढालीसाठी आयकर | ३०% | ३०% |
| उपकर | ३%+ अधिभार | ३%+ अधिभार |
| अधिभार | १ कोटी ते INR च्या दरम्यान उत्पन्न जास्त असल्यास ७% १०% कोटी. आणि, INR १० कोटीपेक्षा जास्त उत्पन्नावर १०% कर लागेल. | एकूण उत्पन्न INR १ कोटीपेक्षा जास्त असल्यास १२% कर |

**भारतीय कर दरांची इतर देशांशी तुलना.**

सकल उत्पन्नाच्या USD १००००० वर प्रभावी आयकर आणि सामाजिक सुरक्षा दर हा पुढील सारणी वरून दिसून येतो.

| रँक. | देश | प्रभावी आयकर दर | प्रभावी कर्मचारी सामाजिक सुरक्षा दर |
|---|---|---|---|
| 1 | बेलिजियम. | ३३.९ % | १३.१ % |
| 2 | ग्रीस | ३०.० % | १६.५ % |
| 3 | क्रोएशिया | २६.८ % | १९.५ % |
| 4 | इटली | ३५.६ % | ९.६ % |
| 5 | जर्मनी | २८.३ % | १५.५ % |
| 6 | डेन्मार्क | ४२.१ % | ०.२ % |
| 7 | कुराकाओ | ३८.६ % | ३.४ % |
| 8 | फ्रान्स | २०.० % | २२.० % |
| 9 | सेनेगल | ४२.० % | ०.० % |
| 10 | सेंट मार्टिन | ३७.४ % | ३.१ % |
| 11 | लक्झेंबर्ग. | २७.९ % | १२.५ % |
| 12 | नेदरलँड | २८.५ % | ११.८ % |
| 13 | पोर्तुगाल | २८.९ % | ११.० % |
| 14 | भारत | २७.३ % | १२.० % |

भारतामध्ये सामान्य, जेष्ठ नागरिक व अति जेष्ठ नागरिक अशा तीन प्रकारा नुसार वेगवेगळया दरानुसार कर आकारणी केली जाते हा दर वेळोवेळी बदल्यात येतो, करनिर्धारण वर्ष २०२१-२०२२ मध्ये हा दर सामान्य नागरिकांच्या दोन लाख पन्नस हजार रु. पर्यंत, जेष्ठ नागरिकांकरिता तीन लाख व अति जेष्ठ नागरिकांकरिता पाच लाख रु. पर्यंत शून्य टक्के होता भारतीय कर दाराची इतर देशाशी तुलना केली असता भारतामध्ये प्रभावी आयकर दर २७.३ टक्के व प्रभावी कर्मचारी सामाजिक सुरक्षा दर १२ टक्के होता असे दिसून येते. देशाच्या सर्वांगीण विकास करिता ज्या वित्ताची गरज असते ती गरज

त्या देशाच्या नागरिकांच्या उत्पन्ना वर कर आकारून पूर्ण केली जाते याकरिता भारतामध्ये आयकर अधिनियम १९६१ लागू करण्यात आला आहे व यानुसार आयकराचे संयोजन होताना दिसून येते.

- **संदर्भ ग्रंथ सूची**

१. आयकर तत्व आणि व्यवहार : मेहरोत्रा आणि गोयल

२. आयकर व अंकेक्षण : डॉ. विजय उपगडे

३. निगमीय कर नियोजन व व्यवस्थापन : डॉ. अरुण सिन्हा,

४. Corporate tax planning, vision publications, Delhi : Lakhotia, R.N.

५. Direct Tax Planning and Management, Taxmann Publications, Delhi : Vinod Singhania

६. Incometaxindia.gov.in.

७. www.fincash.com.